## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०७ ची साक्ष

## निशाणी क्र. ५९

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

नाव – अर्जुन अब्बास पटले,

वय – ४९ वर्षे,

व्यवसाय – पोलीस निरीक्षक,

सध्या नेमणुक – पोलीस दक्षता पथक, जात पडताळणी कार्यालय, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार.

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे यांचे मार्फत.**

०१. मी जुन २०१२ पासुन पोलीस उपनिरीक्षक या पदावर दोंडाईचा पोलीस ठाणे येथे कार्यरत होतो. गु. र. क्र. ३९/२०१२ हा गुन्हा मी फिर्यादीमध्ये दाखल केलेला होता. तत्पुर्वी अकस्मात मृत्यु म्हणुन प्रकरण नोंद होते. दि. १५.१०.२०११ रोजी कॉटेज हॉस्पिटल, दोंडाईचा येथे मंगलबाई राजु भिल, वय– २० ही महिला बाळंतपणाकरीता दाखल झाली होती. तिचा मृत्यु झाला होता. तिच्या मृत्यु बाबत कॉटेज हॉस्पिटल, दोंडाईचा येथील डॉ. महेश मोरे यांनी दोंडाईचा पोलीस ठाणे येथे खबर दिली होती. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील दाखल अकस्मात मृत्यु नोंद खबर ४७/ २०११ दाखविण्यात आली. ) सदर खबर प्राप्त झाल्यानंतर ठाणे अंमलदार यांनी मला लेखी आदेशाद्वारे कळविले की, सदर अकस्मात मृत्युचा तपास तुम्ही करावयाचा आहे. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील तपासाबाबतचा लेखी आदेश दाखविण्यात आला.) आता मला दाखविण्यात आलेला लेखी आदेश तोच आहे. त्याच्यावर पोलीस ठाणे अंमलदार यांची सही आहे. ती मी ओळखतो. सदर लेखी आदेशातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करिता सदर लेखी आदेशास **नि. क्र. ६०** देण्यात येतो. ) सदर आदेश प्राप्त झाल्यावर मी कॉटेज हॉस्पिटल, दोंडाईचा येथे रवाना झालो.

०२. त्याठिकाणी गेल्यावर मयत मंगलबाई राजु भिल हिचे प्रेताबाबत मरणोत्तर पंचनामा पंचांसमक्ष केला. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील मरणोत्तर पंचनामा दाखविण्यात आला. ) आता मला दाखविण्यात आलेला मरणोत्तर पंचनामा तोच आहे.

त्याच्यावर माझी सही आहे व पंचांच्या अश्या सहया आहेत. त्या मी ओळखतो. सदर मरणोत्तर पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करिता सदर मरणोत्तर पंचनाम्यास **नि. क्र. ६१** देण्यात येते. ) सदर मरणोत्तर पंचनामा मयत हिची नैसर्गिक बाळंतपण न होता सिझेरियन झाले होते व त्यादरम्यान रक्तस्त्राव होवुन तिचा मृत्यु झाला असावा असा निष्कर्ष निघाला होता. त्यानंतर मयत हिचे आई वडिल व इतर नातेवाईक यांनी आमच्याकडे मयत हिचा मृत्यु डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे झाल्याबाबत तक्रार केली होती. तक्रार तोंडी स्वरुपात होती. त्यावर आम्ही त्यांना चौकशी दरम्यान जे काही निष्पन्न होईल त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे सांगितले होते. तदनंतर आम्ही मयत हिचे प्रेताचे शवविच्छेदन होणेकरीता कॉटेज हॉस्पिटल, दोंडाईचा यांना पत्र दिले होते. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील पत्र दाखविण्यात आले. ) आता मला दाखविण्यात आलेले पत्र तेच आहे. त्याच्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. सदर पत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करिता सदर पत्रास **नि. क्र. ६२** देण्यात येते. ) तदनंतर कॉटेज हॉस्पिटल, दोंडाईचा यांनी शवविच्छेदन करणेबाबत शासकीय रुग्णालय, धुळे यांना पत्र केले होते व शविच्छेदनाकरीता प्रेत तिकडे पाठविले होते. त्याप्रमाणे मयताचे शवविच्छेदन धुळे येथे करण्यात आले होते. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील पत्र दाखविण्यात आले. ) त्यावर सिव्हील हॉस्पिटल, धुळे यांनी प्रोव्हीजनल पी. एम. रिपोर्ट दिला होता.

०३. तदनंतर मी साक्षीदारांचे जबाब नोंदविले होते. तसेच मी मयत ही कॉटेज हॉस्पिटल, दोंडाईचा येथे दाखल झाल्यापासुनचे तिच्यावर केलेल्या उपचाराबाबत कागदपत्रे मागवुन प्राप्त केले होते. तदनंतर प्रस्तुत अकस्मात मृत्यु प्रकरणातील कागदपत्रे आणि कॉटेज हॉस्पिटल, दोंडाईचा यांच्याकडून प्राप्त कागदपत्रे यांच्यासह मी भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय व सिव्हील हॉस्पिटल, धुळे यांचेकडील सिव्हील सर्जन यांचेकडील समीती यांना सदर प्रकरणी डॉ. साठे व इतर यांचा सदर प्रकरणी निपष्काळजीपणा आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल मिळणेकरीता पत्र पाठविले होते. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील पत्र दाखविण्यात आले. ) आता मला दाखविण्यात आलेले पत्र तेच आहे. त्याच्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. सदर पत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करिता सदर पत्रास **नि.**

**क्र. ६३** देण्यात येते. ) त्याप्रमाणे मला जिल्हास्तरीय तज्ञ समितीचा अहवाल प्राप्त झाला होता. सदर अहवालामध्ये ६ मुद्दे नमुद असुन त्यानुसार सदर प्रकरणी डॉ. साठे यांचा निष्काळजीपणा असल्याबाबत समीतीचा स्पष्ट अभिप्राय आहे. सदर अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर मी शासनातर्फे फिर्यादी होवुन डॉ. साठे यांचेविरुध्द गु. र. क्र. ३९/२०१२ प्रमाणे फिर्याद नोंदविली. फिर्यादीमध्ये दि. १५.१०.२०११ रोजी दाखल अकस्मात मुत्यु प्रमाणपत्र ४७/२०११ चे चौकशीत मयत मंगलबाई राजु भिल, वय–२० ही दि. १४.१०.२०११ रोजी बाळंतणाकरीता कॉटेज हॉस्पिटल, दोंडाईचा येथे दाखल झाली होती, त्यानंतर तिचेवर त्याठिकाणी उपचार करण्यात आले, उपचारादरम्यान तिची नैसर्गिक प्रसुती न झाल्याने सिझेरीयन शस्त्रक्रिया करण्यात आली होती, त्यानंतर तिचा मृत्यु झाला होता, यात चौकशीत कॉटेज हॉस्पिटल येथुन प्राप्त कागदपत्रे, पी. एम. नोटस यासह तज्ञ समीतीचा अहवाल मिळण्यासाठी ते पाठविण्यात आले होते, त्याचा अहवाल प्राप्त झाला त्यानुसार मयत हिचेवर उपचार करणारे डॉ. साठे यांनी निष्काळजीपणा केला आहे असे निष्पन्न झाले आहे आम्ही त्याच्यावर गुन्हा दाखल केल्याबाबत नमुद केले आहे. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील फिर्याद दाखविण्यात आला.) आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद ही तीच आहे. त्याच्यावर माझी सही आहे. सदर फिर्यादीतील मजकुर खरा व बरोबर आहे. (सदर फिर्यादीस **नि. क्र. ६४** देण्यात येते. )

०४. तदनंतर डॉ. साठे यांना अटक करण्यात आली होती. त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा केलेला आहे. घटनास्थळ डॉ. महेश मोरे यांनी दाखविले होते. पंचनाम्यादरम्यान मी, डॉ. महेश मोरे व दोन पंच असे हजर होतो. घटनास्थळ हे कॉटेज हॉस्पिटल, दोंडाईचा येथील महिला वार्ड मधील कॉट क्र. १० येथे होते. घटनास्थळावर मयत हिचा मृत्य झाला होता. तेथुन काहीही जप्त करण्यात आले नव्हते. घटनास्थळाच्या बाजुला स्टोअर रुम व मेडीकल आहे. पंचनामा दि. १६.१०.२०११ रोजी सकाळी ०८.०० ते ०९.०० च्या दरम्यान केलेला आहे. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला.) आता मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्याच्यावर दोन पंचांच्या तसेच माझी सही आहे. सदर घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (सदर घटनास्थळ पंचनाम्यास **नि. क्र.**

**६५** देण्यात येते. )

०५. मला प्रस्तुत प्रकरणातील मयताचे अंतीम पी. एम. नोटस प्राप्त झाले होते. तदनंतर मी साक्षीदारांचे पुरवणी जबाब नोंदविले होते. अकस्मात मृत्यु प्रकरणातील चौकशीदरम्यान व प्रस्तुत गुनहयातील दरम्यान मयतेवर उपचार करणारे डॉ. साठे यांचा निष्काळजीपणा असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आले. मी आरोपीस ओळखतो. आरोपी आज रोजी न्यायालयासमक्ष हजर नाही. (गैरहजेरीमाफीचा अर्ज व पुरसिस अनुक्रमे नि. क्र. ५७ व ५८ कडे दाखल आहे.)

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ई. बी. भावसार यांचे मार्फत.</u>**

०६. मी तपासादरम्यान जे काही केले त्याच्या नोंदी केस डायरीमध्ये ठेवलेल्या आहेत. मी सदर केस डायरी आज रोजी न्यायालयामध्ये आणलेली नाही. सदर केस डायरी पोलीस स्टेशन येथे आहे. वैद्यकीय निष्काळजीपणासारख्या गंभीर गुन्हयात साक्ष देण्याकरीता जात असतांना न्यायालयामध्ये केस डायरी घेवुन जावे असे मला वाटले होते. हे म्हणणे खरे आहे की, तरी देखील मी केस डायरी आणलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासादरम्यान मी ज्या गोष्टी तपासादरम्यान केल्याचे कथन केले आहे त्या गोष्टी मी केलेल्याच नसल्याने मी सदर केस डायरी आज रोजी न्यायालयात आणलेली नाही.

०७. हे म्हणणे खरे आहे की, कथित घटनेच्या वेळी कुटीर रुग्णालय, दोंडाईचा येथे वैद्यकीय अधिकारी म्हणुन डॉ. महेश अंबर मोरे हे कार्यरत होते.

**प्रश्न:** सदर घटनेच्या वेळेस कुटीर रुग्णालय, दोंडाईचा येथे स्त्री रोग तज्ञ म्हणुन डॉ. श्रीकृष्ण राजाराम वाणी हे कार्यरत होते ?

**उत्तर:** सदर घटनेवेळेस डॉ. श्रीकृष्ण राजाराम वाणी हे कुटीर रुग्णालय,

दोंडाईचा येथे कार्यरत होते. परंतु ते स्त्री रोग तज्ञ म्हणुन कार्यरत होते किंवा कसे हे मला माहित नाही.

तपासादरम्यान मी डॉ. श्रीकृष्ण वाणी यांचा जबाब नोंदविला होता. डॉ. श्रीकृष्ण वाणी यांचा जबाब कोणत्या तारखेस नोंदविला होता हे मला सांगता येणार नाही. घटना घडली त्यादिवशी नोंदविला होता किंवा कसे हे मला आठवत नाही. घटनेनंतर डॉ. श्रीकृष्ण वाणी यांचा जबाब मी अंदाजे दोन महिन्याच्या काळाने नोंदविला होता. त्यांच्या जबाबातुन घटनेबाबत यातील मयत बाळंपणासाठी रुग्णालयात दाखल झाली होती, त्यानंतर तिचेवर डॉ. साठे यांनी सिझेरीयन शस्त्रक्रिया केली होती व त्यानंतर तिचा मृत्यु झाला होता अशी माहिती मिळाली होती. डॉ. साठे यांनी सदर शस्त्रक्रिया केली तेव्हा डॉ. श्रीकृष्ण वाणी हे धुळे येथे होते असे निष्पन्न झाले होते. डॉ. श्रीकृष्ण वाणी यांना सदर घटनेबाबत कधी व कशी माहिती मिळाली व माहितीबाबत त्यांचा काय स्त्रोत होता हे मला आता सांगता येणार नाही.

०८. हे म्हणणे खरे आहे की, सिझेरीयन ही शस्त्रक्रिया करतांना भुल तज्ञ आवश्यक असतो. शस्त्रक्रियेकरीता रुग्ण हा शारीरिक दृष्टया सक्षम असल्याशिवाय भुल देता येते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. सदर प्रकरणी डॉ. बोरसे हे भुल तज्ञ होते. सदर प्रकरणी रुग्णाची भुल देतेसमयी शारीरिक परिस्थिती कशी होती याबाबत मी डॉ. बोरसे यांचा जबाब नोंदविला नव्हता. डॉ. श्रीकृष्ण राजाराम वाणी यांनी जबाब देतांना ते शस्त्रक्रियादरम्यान हजर होते आणि रुग्ण सुव्यवस्थित असल्याचे भुल तज्ञांनी सांगितले होते किंवा कसे हे मला आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, ऑपरेशन थिएटरमध्ये स्त्री रोग तज्ञ डॉ. श्रीकृष्ण वाणी हे हजर असल्याची बाब निष्पन्न झाली होती. डॉ. श्रीकृष्ण वाणी यांचा जबाब मी घटनेपासुन साधारण नऊ महिन्यांनी नोंदविला होता किंवा कसे हे मला आता सांगता येणार नाही. डॉ. श्रीकृष्ण वाणी यांनी जबाब देतांना ऑपरेशन थिएटरमध्ये मंगलबाई राजु भिल हिचेवर शस्त्रक्रियादरम्यान मी स्वत: व डॉ. संदीप बोरसे हजर होतो असे सांगितले होते. तसेच शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची परिस्थिती सुव्यवस्थित असल्याचे सांगितले होते.

**(मध्यांतरामुळे तहकुब.)**

(<u>मध्यांतरानंतर शपथेवर उलटतपास सुरु.</u>)

वर नमुद बाबी हया मी सक्षीदाराच्या सांगण्याप्रमाणे नोंदविल्या होत्या. सदर ठिकाणी हजर असलेल्या डॉ. बोरसे यांचा जबाब नोंदविण्याची आवश्यकता मला वाटली होती. मी डॉ. बोरसे यांचा जबाब तपासादरम्यान का नोंदविला नाही हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, डॉ. महेश अंबर मोरे यांचा जबाब मी दि. ०६.०६.२०१२ रोजी नोंदविला आहे. हे म्हणणे खरे आहे की, डॉ. साठे हे कॉटेज हॉस्पिटल येथे कायम नियुक्ती असलेले डॉक्टर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ते खुप अनुभवी असल्याने त्यांना ऑन कॉल कॉटेज हॉस्पिटल येथे मानधनावर बोलाविले जात होते. रुग्णाचे सिझेरीयन झाल्यानंतर तिचे मॉनीटरींग डॉ. मोरे व डॉ. वाणी यांनी केले होते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, रुग्ण महिला ही गरीब व आदिवासी समाजातील असल्याने तिला शस्त्रक्रियेनंतर रक्ताची आवश्यकता भासल्यास खिशातील हजार रुपये तिच्या नातेवाईकांना देवुन रक्त आणण्याकरीता नंदुरबार येथे पाठविले होते. मरणोत्तर पंचनामा व घटनास्थळ पंचनामा करतेवेळी मी रुग्णावर केलेल्या उपचाराबाबतची कागदपत्रे ताब्यात घेतली होती. मी स्वत:हुन सांगतो की, मी छायांकित प्रत घेतली होती. त्या कागदपत्रांची यादी करुन ते ताब्यात घेतल्याबाबत मी पंचनामा केला नव्हता.

०९. हे म्हणणे खरे आहे की, नि. क्र. ६३ कडील पत्रामध्ये उपचाराबाबतची नेमकी कोणती कागदपत्रे होती याची विगतवारी नमुद नाही. मी पोस्ट मार्टम रिपोर्ट वाचला होता. हे म्हणणे खरे आहे की, पोस्ट मार्टम रिपोर्ट वाचल्यानंतर माझ्या निर्दशनास आले की, मयताचा व्हीसेरा काढुन ठेवलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, व्हीसेरा रासायनिक परीक्षणाकरीता पाठविला तर नेमकेपणाने व अचुकपणे मयताचे मृत्युचे कारण समजुन येते. मयताचा काढुन ठेवण्यात आलेला व्हीसेरा मी रासायनीक परीक्षणाकरीता पाठविला नव्हता. केमीकल ॲनायलायझर यांना पत्र देवुन मी मयताचा व्हीसेरा प्राप्त झाला आहे किंवा कसे याबाबत माहिती प्राप्त केली नव्हती. मी नि. क्र. ४७ कडील मयताचे अंतीम पोस्ट मार्टम अहवाल वाचुन पाहिला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये मयताला जॉन्डीस झाल्याचे निदान करण्यात आले होते. मी स्वत:हुन कथन करतो की, पल्मनरी ओडेमा विथ जॉन्डीस असे निदान होते.

१०. फिर्याद देण्यापुर्वी मला आणखीन एखादया तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्याचे सेकंड ओपीनियन घ्यावे असे वाटले नाही. हे म्हणणे खरे आहे की, डॉ. महेश मोरे यांनी जबाब देतेवेळी 'मी पेशंटला आर. एल. सलाईन लावणेसाठी पेशंटच्या केस पेपरवर लिहुन ऑन डयुटी सिस्टर यांना सुचना दिल्या असे व त्यानुसार त्यांनी सदर महिलेचा उपचार केला' असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, तसेच डॉ. वाणी यांनी जबाब देतेवेळी 'डॉ. मोरे हे ऑन डयुटी होते व त्यांनी औषधोपचार सुरु ठेवला होता' असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, कॉटेज हॉस्पिटल येथील परिचारीका जोसोफिना इमॅन्युएल जयकर यांनी जबाब देतेवेळी 'डॉ. श्री. महेश मोरे यांनी त्या बेबीस तपासले तेव्हा त्या बेबीच्या नाका तोंडातुन संडास आत गेल्याचे सांगितले व बाळाची स्थिती नाजुक असल्याचे सांगितले व तिच्यावर औषधोपचार लिहुन दिला व १३.४५ वाजेच्या सुमारास मंगलाबाई हिस ऑपरेशन थिएटरमधुन जनरल वार्डात आणले व तिचेवर मी डॉक्टरांच्या सल्लयानुसार औषधोपचार केला' असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस डॉ. नरेंद्र बावा, डॉ. राहुल राऊळ व डॉ. भुषण अहिरराव हे देखील कॉटेज हॉस्पिटल येथे कार्यरत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या तिघांनीही जबाब देतेवेळी डॉ. मोरे यांनी पेशंटवर औषधोपचार केले असे सांगितले.

११. हे म्हणणे खरे आहे की, मृत रुग्णावर इतर डॉक्टरांनीही उपचार केले होते. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०६.०६.२०१२ रोजी डॉ. मोरे यांनी जबाब देतेवेळी 'डॉ. वाणी यांनी काळजी न घेता हलगर्जीपणाने ऑपरेशन केले व तीस रक्ताची गरज असतांना देखील त्यांनी वेळेवर रक्त न देता शेवटी रक्त कमी पडल्यामुळे व्यवस्थित मॉनीटरींग न केले त्यामुळे ती मरण पावली' असे सांगितले होते. ज्यावेळेला मयताचे नातेवाईकांनी माझ्याकडे तोंडी तक्रार केली त्यावेळी ती मी स्टेशन डायरीमध्ये लिहुन घेतली होती किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या गोष्टी मला सांगता येत नाही त्या गोष्टी हया केस डायरी न्यायालयात आणली असती तर स्पष्ट झाल्या असत्या. हे म्हणणे खरे नाही की, इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सांगण्यावरुन डॉ. साठे यांना लक्ष करुन मी त्यांच्याविरुध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, माण्े सरतपासादरम्यान आकस्मिक मृत्यु चौकशी दरम्यान ज्या गोष्टी मी केलयाचे कथन केलेले आहे त्या गोष्टी मी प्रत्यक्षात केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे

नाही की, मयत महिलेचा मृत्यु हा डॉ. साठे यांच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचा मी खोटा निष्कर्ष काढलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे दोषारोपपत्र सादर केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2025.07.15 11:36:00 +0530

दिनांक : १४/०७/२०२५ (आदित्य घ. नाईक)
स्थळ : दोंडाईचा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | गणेश साईनाथ अहिरे, |
| न्यायालयाचे नांव | - | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा. |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | - | १५.०७.२०२५ |

स्वाक्षरित/-
लघुलेखक (श्रेणी-३)